**कार्यकारी अभियंता (पूर्व उपनगरे), इमारत परवानगी कक्ष, बृहन्मुंबई क्षेत्र,**
**खोली क्र. ३९-४१, तळमजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई — ४०००५१.**

**जा.क्र.: का.अ.(पू.उ.)/इपक/बृ.क्षे./म्हाडा/ET-** 1706 **/२०२४**
**दिनांक :-** 04 OCT 2024

ITC Cell, E-3029445
M. H. & A. D. Authority
Inward No.: 3683
Date: 07.10.24

**प्रति,**
मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, म्हाडा,
पहिला मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.

**विषय :-** पंतनगर, घाटकोपर (पूर्व) येथील इमारत क्र. **७३, पंतनगर हेमंत सह.गृह.नि.संस्था मर्या.,** न.भू.क्र. १८९ (भाग), पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०० ०७५ या इमारतीच्या पुनर्विकासाबाबत.

**संदर्भ :-**
१. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.टीपीएस-१८२०/अ नै २७/ प्र.क्र. ८०/२० नवि-१३, दि. १४.०१.२०२१.
२. म्हाडा परिपत्रक क्र. एम.एच./मुं.मं.-२/उप. मुख्य अ./इ.प.क./बृ.क्षे./प्रा./ ईटी-४५४/२०२१, दि. २३.०२.२०२१.
३. या कार्यालयाचे Amended Plan मंजूरी पत्र क्र. MHADA-१/९५४/२०२२ दि. ०३.१०.२०२२.
४. विकासक, मे. अलग लाईफस्पेस एलएलपी, यांचे दि. २५.०९.२०२४ रोजीचे पत्र व दि. २५.०९.२०२४ रोजीचे हमीपत्र.

**महोदय,**

उपरोक्त विषयाला अनुसरुन संदर्भ क्र. १ च्या शासन निर्णयानुसार व संदर्भ क्र. २ च्या म्हाडा प्राधिकरणाच्या परिपत्रकान्वये विषयांकित प्रकल्पाकरिता विकासकाला पुनर्विकास इमारतीच्या आराखड्यांना मंजूरी देताना फंजिबल चटई क्षेत्र निर्देशांकाकरीता आकारण्यात आलेल्या अधिमुल्य रक्कमेकरिता मे. अलग लाईफस्पेस एलएलपी, यांना ५०% सुट देण्यात आलेली आहे. या पुनर्विकास प्रकल्पातील EWS/LIG/MIG/HIG प्रवर्गातील घरे/सदनिका/वाणिज्यिक-औद्योगिक इतर गाळे घेणाऱ्या ग्राहकांना देय मुद्रांक शुल्काचा भरणा विकासक (मे. अलग लाईफस्पेस एलएलपी) यांनी करणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर योजनेचा लाभ विकासकांना देण्यात आलेला आहे.

विषयांकित इमारतीच्या पुनर्विकासाच्या आराखड्यांना मंजूरी देताना विकासक मे. अलग लाईफस्पेस एलएलपी., यांना दि. १४.०१.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार एकूण **१२५७.४९ चौ.मी.** (निवासी वापर) करिता फंजिबल अधिमुल्य रकमेवर ५०% सुट देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने विकासकांनी **१२६०.६५ चौ.मी.** (निवासी वापर) बांधकाम क्षेत्रफळाकरीताच्या २४ सदनिकांच्या मुद्रांक शुल्कचा भरणा करण्यासंबंधी खालील बाबींची पुर्तता करावयाची आहे.

I. या योजनेमध्ये सहभागी होवू इच्छिणाऱ्या प्रकल्पांकरीता संबंधित विकासकाने ग्राहकांचे पूर्ण मुद्रांक शुल्क भरण्यात येणार असल्याचे हमीपत्र नियोजन प्राधिकरणाला सादर करावे लागेल.

II. अशा प्रकल्पामधील मुद्रांकांचा संपूर्ण खर्च विकासकामार्फत करण्यात आला असल्याने लाभार्थी ग्राहकाचे प्रमाणपत्र विकासकास नियोजन प्राधिकरणाला सादर करावे लागेल.

III. विकासकाने ज्या ग्राहकांच्या अशा प्रकारे मुद्रांकांचा संपूर्ण खर्च केला आहे, त्यांची यादी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी लागेल.

IV. जे प्रकल्प या योजनेत सहभागी होतील त्या प्रकल्पांची अथवा प्रकल्पांच्या ज्या भागासाठी सवलत घेतली आहे त्याची यादी, महानगरपालिका आयुक्त / नगरपरिषद अथवा नगरपंचायत मुख्याधिकारी / जिल्हाधिकारी / नियोजन प्राधिकरण यांच्यामार्फत माहितीकरीता मुद्रांक नोंदणी कार्यालयास कळवावी लागेल. तसेच संबंधित प्राधिकरणाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करावी लागेल.

त्यानुसार विकासकांनी **१२६०.६५ चौ.मी.** (निवासी वापर) बांधकाम क्षेत्रफळाकरीताच्या २४ सदनिकांच्या मुद्रांक शुल्कचा भरणा करणे आवश्यक आहे. सदर इमारतीत विकासकामार्फत २४ सदनिकांची विक्री करण्यात आली आहे. सदर २४ सदनिकांच्या विक्री कराराकरीता मुद्रांक शुल्काचा भरणा विकासकाने केल्याबाबत हमीपत्र सादर केले आहे. याबाबत विकासकाने दि. २५.०९.२०२४ रोजीचे पत्र सादर केले आहे. विकासकाने २४ सदनिकांचे सह दुय्यम निबंधक, कुर्ला २ व सह दुय्यम निबंधक, कुर्ला ३, सह दुय्यम निबंधक, कुर्ला ४ यांचेकडे विक्री करारनामा नोंदणी केलेल्या ग्राहकांचे प्रमाणपत्र व सूची क्र. २ या कार्यालयाकडे सादर केलेली आहे. सदर २४ लाभार्थी ग्राहकांचे मुद्रांक शुल्क विकासकाकडून भरणा करण्याबाबत हमीपत्र विकासकाने सादर केलेले आहे. सदर २३ सदनिकांचा तपशील खालील प्रमाणे असून सोबत परिशिष्ट-अ मधील माहिती म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.

**सोबत :-** परिशिष्ट-अ

आपला विश्वासू,

कार्यकारी अभियंता (पूर्व उपनगरे)/
इमारत परवानगी कक्ष / म्हाडा

**प्रत :-** मा. उपमुख्य अभियंता / इपक / प्रा. यांना माहितीकरीता.

# परिशिष्ट – अ

पंतनगर, घाटकोपर (पूर्व) येथील इमारत क्र. **७३, पंतनगर हेमंत सह.गृह.नि.संस्था मर्या.,** न.भू.क्र. १८९ (भाग), पंतनगर, घाटकोपर (पूर्व), मुंबई ४०० ०७५ या इमारतीच्या पुनर्विकासामधील खालील सदनिकांच्या विक्री करारावर मुद्रांकांचा संपूर्ण खर्च विकासक, मे. अलग लाईफस्पेस एलएलपी, यांचे मार्फत करण्यात आला आहे. सदर लाभार्थी ग्राहकाची यादी म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदनिका क्रमांक | बांधकाम क्षेत्रफळ चौ.मी. | विक्रीबाबत सद्य:स्थिती |
|---|---|---|---|
| १. | सदनिका क्र. २०४ | ४३.५० | Mr. Nilesh B Sawant & Mrs. Swati Nilesh Sawant यांना विक्री करण्यात आला आहे |
| २. | सदनिका क्र. ४०३ | ४३.५० | Paresh Khimji Katariya यांना विक्री करण्यात आला आहे |
| ३. | सदनिका क्र. ५०३ | ४३.५० | Harshil Dakshesh Sarvaiya & Dakshesh M Sarvaiya यांना विक्री करण्यात आला आहे |
| ४. | सदनिका क्र. ५०७ | ५८.६० | Rahul Suryakant Sawant यांना विक्री करण्यात आला आहे |
| ५. | सदनिका क्र. ७०४ | ५४.३३ | Kareena Jairaj Badlani यांना विक्री करण्यात आला आहे |
| ६. | सदनिका क्र. ७०७ | ५८.६० | Mayur Ghanshyam Chaudhari, Priyanka Dhyaneshwar Patil & Ghanshyam Rupchand Chaudhari यांना विक्री करण्यात आला आहे |
| ७. | सदनिका क्र. ९०१ | ५४.३० | Savita Ashutosh Nikam & Ashutosh Rajesh Nikam यांना विक्री करण्यात आला आहे |
| ८. | सदनिका क्र. ९०२ | ५४.१९ | Sameeta Gurudas Mahajan यांना विक्री करण्यात आला आहे |
| ९. | सदनिका क्र. ९०४ | ४७.८६ | Rakesh Ramesh Khamkar यांना विक्री करण्यात आला आहे |
| १०. | सदनिका क्र. १००१ | ५४.३३ | Raj Harishchandra Jaiswar यांना विक्री करण्यात आला आहे |
| ११. | सदनिका क्र. ११०१ | ५४.३३ | Surendra Ramakant Kansara यांना विक्री करण्यात आला आहे |
| १२. | सदनिका क्र. ११०६ | ५४.४४ | Santosh Vasant Pathare & Shilpa Santosh Pathare यांना विक्री करण्यात आला आहे |
| १३. | सदनिका क्र. १२०३ | ४७.८६ | Mr. Sanket Vasudeo Shendekar & Mr. Vasudeo B Shendekar |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | यांना विक्री करण्यात आला आहे |
| १४. | सदनिका क्र. १२०४ | ४३.५० | Uday Madhukar Anerao<br>यांना विक्री करण्यात आला आहे |
| १५. | सदनिका क्र. १२०५ | ५४.५३ | Rupesh Suresh Mahadik<br>यांना विक्री करण्यात आला आहे |
| १६. | सदनिका क्र. १३०१ | ५४.३३ | Amit Chandradant Dhawle<br>यांना विक्री करण्यात आला आहे |
| १७. | सदनिका क्र. १३०२ | ५९.६० | Mr. Prashant Eknath Doke &<br>Mrs. Mangal Prashant Doke<br>यांना विक्री करण्यात आला आहे |
| १८. | सदनिका क्र. १३०५ | ५४.५३ | Vijay Madhukar Karekar &<br>Pratik Vijay Karekar<br>यांना विक्री करण्यात आला आहे |
| १९. | सदनिका क्र. १४०१ | ५४.३३ | Mayank Anil Raut,<br>Anil Damodar Raut &<br>Vimal Anil Raut<br>यांना विक्री करण्यात आला आहे |
| २०. | सदनिका क्र. १४०२ | ५४.१९ | Bhavik Jagdish Nanda &<br>Dipika Bhavik Nanda<br>यांना विक्री करण्यात आला आहे |
| २१. | सदनिका क्र. १४०५ | ६०.०१ | Atul Anand Shinde<br>यांना विक्री करण्यात आला आहे |
| २२. | सदनिका क्र. १५०२ | ५४.१९ | Prakash Kondayya Sudhala<br>यांना विक्री करण्यात आला आहे |
| २३. | सदनिका क्र. १५०७ | ५८.६० | Heema Sunil Doshi<br>यांना विक्री करण्यात आला आहे |
| २४. | सदनिका क्र. १६०४ | ४३.५० | Mr. Chetan Narayan Patel &<br>Mrs. Krupali Chetan Patel<br>यांना विक्री करण्यात आला आहे |
| | **एकुण =** | **१२६०.६५** | |

कार्यकारी अभियंता(पूर्व उपनगरे)/
इमारत परवानगी कक्ष/म्हाडा